सांगली - कोल्हापूर - मुंबई
नवे विचार...नवी सुरुवात
■ RNI NO. MAHMAR/2020/79996
दैनिक
# हॅलो प्रभात
■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001
■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ८२ ■ गुरुवार, २६ जून २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# महापालिकेसाठी भाजपचे स्वबळाचे संकेत?

## मिरजेत मात्र महायुती पॅटर्न : राजकारणाला चमत्कारीक कलाटणी

**सांगली : विशेष प्रतिनिधी**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा ज्वर आता चांगलाच वाढला आहे. जयश्रीताई पाटील यांना भाजपात प्रवेश देऊन भाजपने स्वबळाचे संकेत दिले असावेत असा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे. २०१८ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ३८ जागांवर विजय मिळिवला होता, तर भाजपच्या मित्रपक्षांचे तीन उमेदवार विजयी झाले होते. आता मात्र संपूर्ण राजकारणाची दिशाच बदलली असून जयश्रीताई पाटील भाजपात आल्यामुळे त्यांच्याबरोबर आलेल्या काँग्रेसच्या १४ नगरसेवकांना जागा करून देणे भाजपला क्रमप्राप्त आहे.**

७८ सदस्यांच्या महापालिकेसाठी भाजपची आताची सदस्यसंख्याच ५२ होते, तर मित्रपक्षांचे तीन सदस्य जमेस धरता ती ५५ होते. त्यात यावेळी भाजपचा मित्रपक्ष असलेला जूसुराज्य पक्ष काही जागा मागू शकतो. या राजकीय स्थितीवरून जयश्रीताईना भाजपात प्रवेश देऊन महापालिकेसाठी भाजपने स्वबळाचे संकेत दिले आहेत का? असा अर्थ त्यातून काढला जात आहे.

२०१८ सालच्या महापालिका निवडणुकीत एकसंघ राष्ट्रवादी १६ जागांवर तर काँग्रेस १९ जागांवर विजयी झाली होती. १४ भाजपवासी झाले आणखी दोन काँग्रेस सोडतील असा अंदाज आहे. त्या दृष्टीकोनातून मिरजेतील अजितदादांच्या राष्ट्रवादीकडूनुखील त्यांना गळ टाकण्याचा प्रयत्न होत आहे. जयश्रीताईच्या भाजप प्रवेशाने मिरजेतील राजकारणालाच पूर्णपणे कलाटणी दिली आहे. तर मिरजेत भाजपचे चौधरी बनू पाहणाऱ्या काही नेत्यांचा तोरा पूर्णपणे उतरला आहे. जयश्रीताईच्या भाजपप्रवेशाने मिरजेतील किशोर जामदार भाजपवासी झाल्यामुळे भाजपला चांगलेच बळ मिळाले आहे.

महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर सांगली, मिरज आणि कुपवाड शहरांमध्ये रणधुमाळी माजली आहे. राजकारणाच्या तापलेल्या वातावरणात डाव - प्रतिडावावर लक्ष लागून आहे. तथापि महापालिकेच्या सत्तेत २३ वॉर्ड असलेल्या मिरजेचा मोठा सहभाग असणार आहे. असे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे. ७८ सदस्य असलेल्या सांगली महापालिकेसाठी




मिरजेतूनच २३ सदस्य निवडून जातात. २०१८ साली झालेल्या सांगली महापालिका निवडणुकीत भाजपने मिरजेतील सहा प्रभागातील २३ जागांपैकी १२ जागांवर विजयाचा झेंडा रोवला, त्यावेळी एकसंघ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८ जागांवर तर काँग्रेसला केवळ तीन जागांवर विजय मिळिवता आला.

कुपवाड आणि आणि मिरज हद्दीत येत असलेल्या प्रभाग दोन मधील ईदगाह मतदारसंघात विजय मिळिवण्यात काँग्रेसला यश आले. २०१८ च्या महापालिका निवडणूकवेळी एकसंघ राष्ट्रवादी होती, आता राष्ट्रवादी (अजितदादा) आणि जयंतराव पाटलांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी (शरद पवार पक्ष) अशा दोन राष्ट्रवादी मैदानात उतरणार आहेत, भाजप, शिवसेना बरोबर असल्यामुळे अजितदादांच्या राष्ट्रवादीचे पारडे जड होणार आहे, त्यातच महायुतीने सांगली महापालिकेसाठी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला तर या निर्णयाचा अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला देखील अधिक इच्छुकांना संधी देता येणार आहे, तथापि मिरजेत मात्र किशोर जामदार आणि आ.इद्रिस नायकवडीच महापालिकेची रणनिती आखतील. महापालिका डोळ्यांसमोर ठेऊनच अजितदादांच्या राष्ट्रवादीने महापालिका क्षेत्रात पक्षविस्तार केला, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडे इच्छुकांची संख्या अधिक आहे.

२०१८ च्या निवडणुकीत भाजपने ३८ तर त्यांच्या मित्रपक्षांनी तीन जागांवर विजय मिळिवला होता. अजितदादांची राष्ट्रवादी महायुतीत असल्याने आणि स्थानिक नेत्यांची भरणा मोहिम त्यांच्यात सुरू असल्याने जागावाटप कसे होणार? या प्रश्नाने भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांची वाढणारी डोकेदुखी भाजपच्या स्वबळाच्या नाऱ्याने संपुष्टात येणार आहे.

सांगली महापालिकेसाठी महायुतीतील घटक पक्षांमध्येच जीवघेणी चूरस आहे. तथापि या महापालिका निवडणुकीतील सत्तेचे भवितव्य मिरजकरांवरच अवलंबून असणार आहे. ७८ पैकी २३ नगरसेवक मिरजेतूनच जाणार असल्याने महापालिकेवर वर्चस्व कुणाचे राहणार या गहन प्रश्नाची सोडवणूक करण्याची जबाबदारी मिरजकरांवर येणार आहे.

महापालिकेच्या रिंगणात जूस्वराज्य पक्षानेदेखील उडी घेतली आहे. महापालिकेत अस्तित्व ठेवण्याचा जूनसुराज्य पक्षाचे नेते समितदादा कदम यांचा प्रयत्न आहे. या पक्षात दाखल होणाऱ्यांची संख्यादेखील लक्षणीय आहे. महायुतीतून निवडणूक लढविताना जनसुराज्य पक्षालादेखील त्यांचा जागांचा वाटा द्यावाच लागणार आहे. महापालिका निवडणुकीचे वातावरण सध्या विचित्र वळणावर आले आहे. परिस्थीती पाहून आघाडीचा आणि ताकद असेल तेथे मैत्रीपूर्ण लढतीचा पर्याय स्विकारला जाईल असा अंदाज राजकीय जाणकारांचा आहे.

जयश्रीताई यांच्या भाजपात जाण्याने काँग्रेसमध्ये नैराश्येचे वातावरण आहे. आतापर्यंत कायमच काँग्रेसला साथ देणाऱ्यांनी कमळ हातात घेतल्यामुळे काँग्रेसला तिसऱ्या फळीतील इच्छुकांना उमेदवारी द्यावी लागणार आहे. जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते मात्र अंग चोरून आहेत. जयश्रीताईना विधानसभेची उमेदवारी मिळण्यासाठी आणि त्यानंतर त्यांचे निलंबन रद्द व्हावे यासाठी त्यांनी केलेले सर्वच प्रयत्न व्यर्थ गेले आहेत. राज्याचे मुख्यमंत्रीपद भुषविलेल्या वसंतदादांची नातसून काँग्रेसचा त्याग करून भाजपात जाते हा जिल्ह्यातील काँग्रेसला बसलेला मोठा झटका आहे अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये आहे.

## संक्षिप्त...

### पंचगंगा ईशारा पातळीच्या दिशेने

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असून, नदी आता इशारा पातळीच्या दिशेने वाटचाल करत आहे. मुसळधार पावसाने कोल्हापूर जिल्ह्याला गेल्या दोन दिवसांपासून झोडपून काढले आहे. आज (बुधवार) सकाळी नोंदविलेल्या आकडेवारीनुसार, पंचगंगेची पाणी पातळी ३३.६ फ टांवर पोहोचली आहे. जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा जोर कायम असल्याने अनेक नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. याचा थेट परिणाम जिल्ह्यातील वाहतुकीवर झाला असून, तब्बल ५६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

### महायुतीच्या 'रडार'वर काँग्रेस

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूरच्या राजकारणात दोस्त दुश्मन बनले आहेत, तर दुश्मन दोस्त झाले आहेत. परिणामी, महायुतीच्या 'रडार'वर आता काँग्रेस पक्ष आला आहे. काँग्रेसने राष्ट्रवादीच्या हातात हात घालून महापालिकेसह जिल्ह्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांवर वर्चस्व राखले. मात्र, कालांतराने एकेक संस्था काँग्रेसच्या हातातून निसटल्या. आता तर राजकीय फासे पूर्णतः पालटले आहेत. जिल्ह्याच्या राजकारणात काँग्रेसला नामोहरम करण्यासाठी महायुती आडाखे बांधत आहे. काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील हे टार्गेटवर आहेत.

### अरुण तनपुरे राष्ट्रवादीत

**राहुरी : हॅलो प्रभात**

ना. अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबुराव बापूजी कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे व हर्ष तनपुरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला.

## बांधकाम कामगार योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आले पाहिजे : राजेश्वरी नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

सामान्य गोरगरीब महिलांनी आपल्या कुटुंबाचे हित जोपासण्यासाठी महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आले पाहिजे. गावातील गरीब सर्वसामान्य कुटुंबातील एक ही लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिला नाही पाहिजे यासाठी यशवंत युवक संघटना निश्चित आपल्याला सहकार्य करेल असे प्रतिपादन राजेश्वरी नाईक यांनी केले. मांगरूळ (ता. शिराळा) येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाच्या वतीने कामगारांच्यासाठी आलेल्या साहित्याचे वितरण राजेश्वरी रणधीर नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी



सरपंच संग्राम पाटील, शिराळा नगरपालिकेच्या नगरसेविका ॲड. नेहा सूर्यवंशी,सीमा कदम, अनिता नाईक, वारणा मोरणा भाजीपाला संघाचे अध्यक्ष भगवान मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रथम स्वागत प्रास्ताविक मनोज मस्के यांनी केले.

नेहा सूर्यवंशी म्हणाल्या, बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून लाभार्थ्यांची नोंदणी झाली की त्यांना अनेक शासनाच्या योजना मिळवू शकतात. यामध्ये आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणापासून पासून उच्च शिक्षणापर्यंत स्कॉलरशिप, मुलाचा विवाह व इतर योजना या कामगार मंडळाच्या माध्यमातून आपल्याला मिळू शकतात ही आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे.यासाठी महिलांनी संघटित होऊन एकमेकाला सहाय्य करण्याची गरज आहे. आणि त्याचा पाठपुरावा आपल्याकडून होणे तितकेच महत्त्वाचे आहे. ज्या महिलांना थोडेफार व्यवहार ज्ञान आहे त्यांनी सामान्य कष्टकरी कामगारापर्यंत पोचवून या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घेऊन काम केले पाहिजे. या मतदारसंघांमध्ये शिवाजीराव नाईक व रणधीर नाईक यांनी अहोरात्र सामान्य लोकांच्या साठी सेवा केली आहे. या पुढील काळातील त्यांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेसाठी निश्चित सहकार्य मिळेल.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य शोभा पाटील, प्रदीप माने, शोभा मस्के, विजय मस्के, सुनिता खांडेकर, अंजना शेणवी, शारदा शिंदे, रूपाली जाधव, इंद्रायणी शेणवी, उज्वला खांडेकर, संगीता शेनवी, अनिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवाजीराव नाईक यांची 'राष्ट्रवादी'च्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**शिराळा : हॅलो प्रभात**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी राज्याचे माजी मंत्री व ज्येष्ठ नेते शिवाजीराव नाईक यांना प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. सह्याद्री अतिथी ग्रह, मुंबई येथे अजितदादा पवार,सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला.यानंतर राज्याचे माजी मंत्री व ज्येष्ठ नेते शिवाजीराव नाईक यांना प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले.

शिवाजीराव नाईक यांनी मागील दोन महिन्यापूर्वी मोजक्या कार्यकर्त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अजितदादा



पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे प्रवेश केला.श्री.नाईक यांनी १३ वर्षे सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट केलेले काम, त्यानंतर पाच वर्षे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री व त्यानंतर आमदार म्हणून केलेला राजकीय प्रवास व प्रशासनामधील गाडा अभ्यास असल्याने त्यांना राज्यामध्ये काम करण्याची संधी अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली असल्यामुळे शिराळा मतदारसंघांमध्ये व संपूर्ण सांगली जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी आ.शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी सांगली जिल्हा अध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील, माजी आमदार राजेंद्रआण्णा देशमुख, सांगली शहर राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे अध्यक्ष पद्माकर जगदाळे, दिग्विजय सुर्यवंशी, रणधीर नाईक, केदार पाटील, शिराळा तालुका अध्यक्ष अशोक पाटील, शहाजी पाटील, सी. एच.पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठातील २६ अभ्यासक्रमांना प्रवेश नाही

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

### मनविसेचा विभागप्रमुखांवर कारवाईचा पवित्रा

शिवाजी विद्यापीठाने परिसरात सुरू केलेले नवे २८ अभ्यासक्रमांपैकी तब्बल २६ अभ्यासक्रमांना अपुऱ्या प्रतिसादामुळे पुनः प्रवेश प्रक्रिया राबवावी लागत असल्याची नामुष्कीजनक परिस्थिती उद्भवली आहे. या प्रकरणी विद्यापीठातील विभाग प्रमुखांच्या निष्काळजी कारभाराविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने संतप्त प्रतिक्रिया दिली असून, तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी विभागांना भेटी दिल्या असूनही दोषींवर कोणतीही कारवाई झाली नसल्याने मनविसेने नाराजी व्यक्त केली



आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारी, परीक्षांच्या वेळापत्रकातील गोंधळ,

लेक्चरमध्ये अनियमितता, संवादाचा अभाव या बाबी वारंवार निदर्शनास येत असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष सुरु असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांची संख्या कमी असताना प्राध्यापकांची भरती विद्यापीठ निधीतून का करण्यात आली? यावर देखील प्रश्न उपस्थित करत, या निर्णयाचा खुलासा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

उत्तम वंदुरे, नितेश गणेशाचार्य, अभिजीत राऊत, अजिंक्य शिंदे व इतर पदाधिकाऱ्यांनी कुलगुरूंना सादर केलेल्या निवेदनात ही मागणी मांडली असून, लवकरात लवकर निर्णय न झाल्यास विद्यार्थ्यांच्या हितासाठी उग्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.






# जागतिक अमली पदार्थविरोधी दिन



**हॅलो प्रभात**

**भावी तरूण पिढीला व्यसना-पासून वाचविण्यासाठी आता शासनच सरसावले आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य आणि जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजनाव्यतिरिक्त) मादक पदार्थांवरील बंदीची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यानुसार राज्याचे व्यसनमुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून या विभागाच्या दिनांक १७ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्राने सन १९८७ पासून अमली पदार्थ हा विषय महत्वाचा मानला आहे.**

भारतात नार्कोटिक ड्रग्स अॅण्ड सायकोट्रॉपिक सबटंन्स क्ट १९८५ (एनडीपीएस) हा अंमली पदार्थ विरोधी कायदा आहे. मालद्वीप सरकारने संयुक्त राष्ट्रांना मादक पदार्थांच्या संबंधित संमेलनासाठी अनुमोदन दिले आणि पहिले अंमली पदार्थावर आधारित संमेलन १९६१ झाले. दुसरे संमेलन १९७१ मध्ये अवैध सायकोट्रापिक पदार्थ यावर झाले. गैरकानुनी धंद्याच्या विरोधात १९८८ मध्ये तिसरे संमेलन झाले. या कायद्यांतर्गत अमली वस्तू किंवा औषधाचे उत्पादन, वितरण, सेवन, विक्री, वाहतूक, साठा, वापर, आयात-निर्यात यावर देशात बंदी आहे.

प्रत्येक व्यक्ती, मुले, मुली यांच्यामध्ये जनजागृती व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या सामाजिक व विशेष सहाय विभागाने उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे.

राज्यात जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी यांनी २६ जून या दिवशी आपल्या परिसरातील शाळा आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच गावात/शाळामधून अमली पदार्थविरोधी पदफेरी काढणे, अमली पदार्थावर बंदी याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करणे, व्यसनमुक्ती हीच राष्ट्रभक्ती याविषयी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, अमली पदार्थावर पथनाट्याचे आयोजन करणे, अमली पदार्थ विरोधी जनजागृती करणे, अमली पदार्थाच्या सवयी सोडविण्यासाठी या दिवशी निर्धार प्रतिज्ञा देणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. शिवाय अमली पदार्थाच्या विरोधी काम करणाऱ्या व्यक्ती, सामाजिक संस्था, संघटना यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांनी मदत करावयाची आहे, याबाबतचे शासन परिपत्रक १९ जूनला पारित झाले आहे.

### अमली पदार्थ कशाला म्हणतात?

ज्या पदार्थांच्या सेवनाने माणसाला विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा, तार किंवा धुंदी येते. त्यांना रुढार्थाने मादक पदार्थ किंवा अमली पदार्थ म्हणतात. अफू व त्यापासून तयार केलेले मॉर्फीन, हेरॉईन इ. पदार्थ, कोकेन, भांग, गांजा, चरस (हशिश) वगैरे पदार्थाचा मादक पदार्थात समावेश केला जातो. ब्राऊन शुगर, झंडूबाम रुमालावर टाकून त्याचा नाकाद्वारे वास घेतात. यातून त्यांना नशा येते. स्पिरीटचाही नशेसाठी अशाचप्रकारे वापर केला जात आहे. यापुढेही जाऊन श्रीमंत लोक सिंथेटीक अमली पदार्थ आणि आता घातक जीवघेणा एमडीचा (मेफेड्रॉन) वापर होऊ लागला आहे. शिवाय मॅजिक मश्रूम, एलसीडी, मारिजुआना, म्याव-म्याव, डॅरनेक्स, शिलावती, वेदनाशामक गोळ्या, व्हाईटनर ते औषधे याचाही वापर नशेसाठी केला जाऊ लागला आहे. भारतात एनडीपीएस अॅक्टनुसार (नार्कोटिक ड्रग्ज अॅन्ड सायकोट्राफिक सब्सटंन्सेस अॅक्ट-१९८५) नशीले पदार्थ वापरणे गुन्हा आहे. ड्रग्ज तुम्ही तुमच्यासाठी वापरा किंवा दुसऱ्या कामासाठी वापरा, तो गुन्हाच आहे. त्याला दंड हा ड्रग्स किती प्रमाणात वापरतो याच्यावर अवलंबून असते. जर एखाद्याला ड्रग्स बाळगण्यासाठी किंवा सेवन केल्यामुळे शिक्षा झाली असेल आणि त्याची सुधारायची इच्छा असेल तर तो एखाद्या डी-डिक्शन सेंटरमध्ये उपचार घेऊ शकतो. त्याने उपचार मध्येच थांबवले आणि परत व्यसनाकडे वळाला तर त्याला परत शिक्षा होऊ शकते. ग्रामीण भागात अमली पदार्थ सेवनाचे प्रमाण कमी आहे. मात्र शहरांच्या ठिकाणी याचे प्रमाण वाढत आहे. हे चिंताजनक आहे. मुंबईत ग्रँट रोड स्टेशन, दाणाबंदरला जाणारा ब्रीज, डॉकयार्ड कॉलनीतल्या वस्त्या, माहीम कोळीवाड्याकडे जाणारा ब्रीज, कुर्ला-सांताक्रुझ जोडमार्गाच्या समोरील गल्ल्या, मानखुर्द, शिवाजीनगर, गोवंडी आदी ठिकाणच्या झोपडपट्ट्या, खाडीच्या किनारीलगतच्या झोपडपट्ट्या इथं नशा करणारी टोळकी आपल्याला दिसतात. त्यांना आपण 'गर्दुले' म्हणतो. हे गर्दुले आपली नशा भागविण्यासाठी कोणत्याही थराला जावून गुन्हेगारीकडे वळतात.

अर्थात चोरी करणे, लुटमार करणे, मोबाईल चोरणे, महिलांच्या गळ्यातील दागिने हिसडून घेऊन विकून ते पैसे मिळवून नशा करतात. शिवाय बलात्कार, मारामारी, खून करण्याची त्यांची प्रवृत्ती वाढते. केवळ जिज्ञासेपोटी अमली पदार्थांची चव चाखणारे आज या गर्तेत आपोआपच सापडले जात आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच उच्चभ्रू वर्गातील लोकही यात गुरफटू लागले आहेत.

सुरुवातीला कोणीही अमली पदार्थ व्यसनाधीन होण्यासाठी सेवन करीत नाही. काही विद्यार्थी अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून सुरुवातीला अमली पदार्थाचे सेवन करतात. मुलीही अमली पदार्थाच्या विळख्यात अडकू लागल्या आहेत. बाजारात नशा आणणारे अनेक पदार्थ मिळतात. काही औषधांनीही नशा येते. काहीजण अमली पदार्थ शरीरात टोचून घेतात, पण कोणताही अमली पदार्थ हा शरीरासाठी घातकच आहे. या विळख्यात गटांगळ्या खाणाऱ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामाविषयी जागृती करण्यासाठी २६ जून या दिवसाचे महत्त्व आहे.

अनेक कार्यक्रमांनिमित्त याविषयी जनजागृती आणि या पदार्थांपासून दूर कसे राहावे, तसेच आपल्या प्रकृतीविषयी गंभीर राहण्याविषयी सावध केले जाते. शैक्षणिक संस्थांबरोबरच इतर सेवाभावी संस्थाही या कामात पुढाकार घेत आहेत. यात आता सामान्य माणसांचाही सहभाग असणे अपरिहार्य बनले आहे. इतकी ही समस्या जटील बनली आहे.

**तरूणांना अमली पदार्थाचा विळखा...अमली पदार्थाची विक्री करताना टोळीला अटक...रेल्वे फूटपाथवर चालतो अमली पदार्थांचा धंदा... अमली पदार्थांच्या सेवनाने दोघांचा मृत्यू...विमानतळावर तीन कोटींचे ड्रग्ज सापडले...दोघांना अटक...अशा आशयाच्या बातम्या आपण रोज वर्तमानपत्रात व न्यूज चॅनेलवर वाचतो..ऐकतो. आजची बहुसंख्य तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात सापडली आहे. आपल्या देशाच्या हद्दी अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या देशाला लागून असल्यामुळे याचे प्रमाण वाढत आहे. पालकांना तरूणांना यापासून रोखण्याची समस्या सतावत आहे. शासनाने अशा पदार्थांवर बंदी घातलेली आहे. दरवर्षी २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. याविषयी थोडंस...**



## २६ जून : जागतिक अमली पदार्थविरोधी दिन

**व्यसनांची लक्षणे...**

- वर्तणुकीत अचानक बदल घडतो.
- अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या मुलांची शाळेत उपस्थिती कमी होऊ लागते.
- अभ्यासात, खेळ किंवा अन्य कार्यक्रमात त्याचे मन लागत नाही.
- पॉकेटमनीसाठी सतत पालकांकडे तगादा.
- घरातील वस्तू हळूहळू गायब होणे.
- जुने मित्र सोडून नवीन मित्र बनविणे.
- बाथरुममध्ये जास्त वेळ घालविणे.
- घरात इंजेक्शन अथवा सिरिंज आढळणे.
- डोळे लाल, निस्तेज होणे, सूज येणे.
- बोलताना अडखळणे, उभे राहताना त्रास.
- भूक न लागणे. • वजन कमी होणे.
- निद्रानाश, व्यसनांच्या परिणामाने फुफ्फुस, स्मरणशक्ती, अवयव निकामी होणे, अस्वस्थता, मानसिक आजार वाढणे.
- व्यक्तिगत स्वच्छता न करणे, अंगातील कपड्यांबद्दल बेफिकिरीने वागणे.

**यावर उपाय**

- पालकांनी आपल्या पाल्याला समजून घ्यावे. त्याच्याशी मित्र म्हणून वागा. काय वाईट..काय चांगले हे गोडीने व मित्रत्वाच्या नात्याने पटवून द्या. त्याच्याशी प्रेमाने वागा...त्याला विश्वासात घ्या.
- वाईट मित्रांची संगत करू देऊ नका.
- चुकीचे पाऊल पडताना वेळीच सावध करायला हवे.
- शिक्षकांचे हुशार मुलांबरोबर कमी मार्क्स असलेल्या मुलाकडेही तितकेच लक्ष हवे.
- कोणत्याही मुलाला कमी लेखू नका. तसे झाले तर ती व्यसनाकडे वळली जातात.

### युवकांना अतिशय महत्त्वाचा सल्ला

***अमली पदार्थ वेळेवर न मिळाल्याने किंवा महाग झाल्याने युवकांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. यात महाराष्ट्रातील युवकांचा क्रमांक वरचा आहे. आपले जीवन सुंदर आहे. ते एकदाच मिळत असते. अमली पदार्थांपासून दूर राहून आपले जीवन सुंदर बनवा. त्यामुळे आरोग्याला महत्त्व द्या... व्यायाम करा...खेळ खेळा...पण अमली पदार्थांना थारा देऊ नका!***

### पुरवठा कोठून होतो?

आपल्या बॉलिवूडमध्ये 'उडता पंजाब' हा चित्रपट येवून गेला. यात पंजाबमध्ये पाकिस्तान सीमेवरून अमली पदार्थांची तस्करी केली जात असल्याचे दाखविले आहे. याचा अर्थ आपल्या शेजारील देशातून म्हणजेच पाकिस्तान, नेपाळ, बांग्लादेश, अफगाणिस्तान, भूतान येथून अमली पदार्थ आपल्या देशात येतात. याची किंमतही लाखो रूपयात असते. याची खरेदी-विक्रीही सांकेतिक चिन्हे, खुना व भाषांच्या माध्यमातून होते.

'हशीश'सारखे अंमली पदार्थ नेपाळमधून पुरविले जातात. नायजेरियनांकडून भारतात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी केली जाते. नायजेरियन विद्यार्थी वा कपड्यांचे व्यापारी या माध्यमातून ही तस्करी केली जाते. नायजेरिया देशातील नागरिक किनारी भागात मोठ्या प्रमाणात वावरताना दिसतात.

### औषधोपचार
### मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन

शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून मद्य आणि अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना म्हणून स्वयंसेवी संघटनांना पुनर्वसन केंद्र चालवण्यासाठी अनुदान दिले जाते. व्यसनविरोधी शिबिरांचे आयोजन करणे, जनजागृती करणे, व्यसनाधीन युवकांचे पुनर्वसन करणे अशा उपाययोजनांसाठीही आर्थिक सहाय्य पुरवले जाते. शाळा-महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना अमली पदार्थाच्या घातक परिणांमाविषयी माहिती दिली जाते. शिवाय मुंबईत केईएम हॉस्पिटलनंतर आता राजावाडी हॉस्पिटलमध्येही अमली पदार्थ व्यसनाधीन झालेल्यांवर मोफत उपचार केले जातात.

### तज्ज्ञ म्हणतात...

डॉ. प्रसन्न खटावकर (मानसोपचार तज्ज्ञ, सोलापूर)- अमली पदार्थांचे सेवन हा एक मानसिक आजार आहे. याचे सेवन करणारे चटावलेले असतात. याचा वाईट परिणाम हा त्या व्यक्तिच्या आयुष्यावर तर होतोच, मात्र कुटुंब आणि समाजावरही होत असतो. सर्व व्यसनांवर निश्चित उपचार आहेत.

अमली पदार्थांच्या विळख्यातून सहजपणे बाहेर येण्यासाठी योग्य तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य कालावधीमध्ये उपचार व्हायला हवेत. असे केले तरच पुन्हा नवीन आयुष्याची सुरुवात करता येते.

---

## संपादकीय

# हवाई वाहतुकीची विश्वासार्हता!

अहमदाबादमध्ये नागरी वस्तीमध्ये विमान कोसळून झालेला अपघात, ही हवाई वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित करणारी भीषण दुर्घटना म्हणावी लागेल. लंडनच्या दिशेने निघालेले 'बोइंग ७८७-८ ड्रीमलायनर' हे प्रवासी विमान उड्डाणानंतर काही मिनिटांतच तेथील मेघानीनगर भागातील नागरी वस्तीवर कोसळले. या विमानात २४२ प्रवासी होते. त्यांपैकी एकजण वगळता कोणीही बचावल्याची शक्यता नाही. हे विमान दाट वस्तीतील वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या इमारतीवर कोसळल्यामुळे तेथील काही शिकाऊ डॉक्टरांसह नागरिकांचाही मृत्यू झाला; तसेच अनेक जण जखमी झाले असून अनेक इमारती आणि वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या विमानात १७० भारतीय, ५३ ब्रिटिश, सात पोर्तुगीज आणि कॅनडाच्या एका नागरिकाचा समावेश आहे. या अपघातामागे तांत्रिक बिघाड किंवा इमारतीला धडक अशा शक्यता वर्तविण्यात येत आहेत. विविध यंत्रणांमार्फत सुरू झालेल्या तपासातून नेमकी कारणे समोर येतील. मात्र, हवाई वाहतुकीतील असुरक्षितता या अपघातातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

विमानांचा अपघात होण्याच्या घटना तुलनेने कमी असल्या, तरी अशा अपघातांमुळे होणारी जीवित आणि वित्तहानी मोठी असते. गेल्या शतकामध्ये जगभरात अनेक ठिकाणी विमान अपघात झाले. नंतर आधुनिक तंत्रज्ञान, काटेकोर प्रशिक्षण आणि कठोर सुरक्षाव्यवस्था यांमुळे या अपघातांचे प्रमाण तुलनेने घटले होते. पाच वर्षांपूर्वी केरळमधील कोळीकोड येथे झालेल्या विमान अपघातात १९० जणांचा मृत्यू झाला. त्यापूर्वी कर्नाटकातील मंगळूरमध्ये मोठा अपघात झाला होता. सन १९८५मध्ये खलिस्तानी दहशतवाद्यांनी एअर इंडियाच्या विमानात स्फोट घडवून आणला होता. प्रामुख्याने तांत्रिक बिघाड, पायलटची चूक, नियंत्रण यंत्रणेतील त्रुटी, खराब हवामान आणि कमी होणारी दृश्यमानता; तसेच विमानाला पक्ष्याची धडक किंवा घातपात अशी कारणे या अपघातांमागे असल्याचे आढळले आहे. काही दिवसांपूर्वी इंडिगोच्या विमानाचा पुढील भाग गारा पडल्याने फुटला होता.

अहमदाबादेतील अपघातग्रस्त विमानाचे वैमानिक सुमीत सभरवाल यांना सव्वाआठ हजार तासांचा उड्डाणांचा अनुभव होता आणि उड्डाणानंतर त्यांनी नियंत्रण कक्षाशी आपत्कालीन संपर्कही साधला होता. 'एअर इंडिया'च्या ताफ्यात साडेअकरा वर्षांपूर्वी समाविष्ट झालेले विमानही फार जुने नव्हते. आजवर 'बोइंग-७८७-८ ड्रीमलायनर' या आधुनिक सुरक्षा यंत्रणा असलेल्या विमानाचा मोठा अपघात झाल्याची नोंद नाही. तुलनेने सुरक्षित मानल्या गेलेल्या या विमानात तांत्रिक त्रुटी किंवा बिघाड असल्याचे समोर आले, तर कंपनीच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या एअर इंडियाच्या ताफ्यात २७ बोइंग विमाने आहेत. तसेच नव्या पावणेसहाशे विमानांच्या खरेदीचे नियोजन असून त्यामध्येही काही बोइंग ड्रीमलायनर वर्षाअखेरीस ताफ्यात समाविष्ट होणे अपेक्षित आहे. या अपघातानंतर जगभरातून चिंता व्यक्त झाली आणि 'बोइंग'चे समभाग घसरले. या पार्श्वभूमीवर विमान खरेदीबाबत पुन्हा आढावा घेतला जाऊ शकतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा विस्तार आणि भारतीयांच्या उंचावलेल्या जीवनमानामुळे भारतीयांसाठी विमान प्रवास आवाक्यात आला आहे. सध्या देशात दररोज सुमारे काही लाख नागरिक विमानप्रवास करतात. गेल्या वर्षी ३८ कोटी नागरिकांनी विमानप्रवास केला होता. अहमदाबाद अपघातानंतर यापैकी अनेकांच्या मनात भीती निर्माण होणे साहजिक आहे. या पार्श्वभूमीवर या प्रवाशांच्या जीविताच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. विशेषत: देशात विमानतळांच्या परिसरात, काही ठिकाणी विमानतळांच्या भिंतींना अगदी चिकटून मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती आहे. त्यामुळे काही धोके असल्याचे निदर्शनास आले आहे. विमानतळावरील खबरदारीचे उपाय आणि वैमानिकांचे प्रशिक्षण अशा बाबींचा आढावा घेणेही आता गरजेचे आहे. जगभरात उड्डाण किंवा उतरण्याच्या वेळी सर्वाधिक विमानांचे अपघात झाल्याचे आकडेवारी सांगते; त्यात सुधारणांसाठी अधिक लक्ष द्यावे लागेल. अपघाताच्या कारणांचा शोध घेऊन सरकार, विमान वाहतूक कंपन्या आणि या क्षेत्रांतील नियामकांनी एकत्रित पावले उचलणे आवश्यक आहे. विमान अपघातांचे प्रमाण कमी असले, तरी या घटनांची पुनरावृत्ती टाळणे आणि 'शून्य अपघात' हे लक्ष्य समोर ठेवून प्रवाशांच्या सुरक्षिततेची हमी दिल्यावरच हवाई वाहतुकीची विश्वासार्हता पुन्हा कमावता येईल.

---

# लोकोत्तर युगपुरुष
## २६ जून : राजर्षी शाहू महाराज जयंती

**हॅलो प्रभात**

**महाराष्ट्राने देशाला अनेक समाज सुधारक दिले, महात्मा फुलें पासून ते आंबेडकर, गाडगे महाराज, कर्मवीर असे अनेक. पण समतेची शिकवण देणारे शाहू महाराज हे लोकोत्तर पुरूष होते. समाजातल्या तळागाळातील लोकांना त्यांचा आधार वाटायचा.**

भारतात पहिल्यांदा सर्व समाजाच्या मुलांना शिक्षणाची व वसतिगृहाची सोय करून देणारे ते युगपुरूष होते. मुलीच्या शिक्षणालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. ते कर्ते सुधारक होते. आपल्या राज्यातील फासेपारधी, मातंग, गारूडी यांना त्यांनी आपल्या दरबारात नोकऱ्या दिल्या. एवढे करून ते थांबले नाहीत तर अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय करून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. एकदा पुण्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बांधून त्याच्या अनावरणासाठी ब्रिटनचा सम्राट प्रिन्स ऑफ वेल्सला निमंत्रित करून पुण्यात आणले आणि महाराजांच्या पुतळ्याला सम्राटाला मुजरा करण्यास भाग पाडले..! असा हा पराक्रमी, मत्सुद्दी राजा होता. त्यांनी अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. धनगर-मराठा विवाह घडवून आपली उक्ती आणि कृती एकच आहे हे समाजाला दाखवून दिले. ते कलासक्त होते. आपल्या राज्यातील कलाकारांना ते राजाश्रय देत. एकदा नाटक पाहताना शिवाजी महारांजांच्या भूमिका करणाऱ्या तरूणाला त्यांनी लवून मुजरा केला. ते कुस्त्यांचे चाहते होते. आजही कोल्हापुरात उत्तम मल्ल तयार होतात. ही कोल्हापूरकरांना महाराजांनी दिलेली देणगीच आहे.



राज्यातील शेतकरी, शेतमजूरांची ते काळजी घेत. शेतकऱ्यांसाठी त्यांनी त्या काळात राधानगरी धरण बांधून शेतीविकासाला चालना दिली. शेतमाल खरेदी-विक्रीसाठी त्यांनी मार्केट यार्ड तयार करून कोल्हापुरात एक बाजारपेठ निर्माण केली. त्यांनी विधवेच्या पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. कुलकर्ण्यांची वतने रद्द केली. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणारा हा भारतातील पहिला राजा होता. आजही महाराजांच्या कार्याचा अलौकीक ठसा कोल्हापूर परिसरात दिसून येतो. महाराज हे रयतेचे राजे होते. छत्रपतींचे वारसदार होते. एकदा जंगलात अस्वल त्यांच्या अंगावर आले असतांना त्यांनी त्याचा सक्षमपणे मुकाबला केला.

एकदा व्हाईसरायने संस्थानिकांशी चर्चा करण्यासाठी देशातील सर्व संस्थानिकांना निमंत्रित केले होते. त्यामध्ये शाहू महाराजांनी आपल्या शरीरयष्टीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांचासारखा पराक्रमी, प्रजेचे हीत पाहाणारा, साहित्य-कला-संस्कृतीची पाठराखण करणारा, समाजवादी समाजरचनेचा स्वीकार करणारा राजा होणे आजच्या घडीला तरी शक्य नाही.

***• शेतकरी, कारागीर, कलाकार, विद्यार्थी, गोरगरीब यांची ते काळजी घेत. अशा या महान पराक्रमी राजाचे अखेर दिनांक ६ मे १९२२ रोजी निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतीस कृतज्ञतापूर्वक विनम्र अभिवादन..!***

---

# संग्राम देशमुख यांचा हिंगणगाव बु. ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार




**कडेगाव : हॅलो प्रभात**

सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्राम संपतराव देशमुख यांची सांगली जिल्हा नियोजन समिती कार्यकारी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल हिंगणगाव बुद्रुक ता. कडेगांव येथील ज्येष्ठ नेते हणमंतराव कदम व समस्त ग्रामस्थ हिंगणगाव बुद्रुक यांच्या वतीने संग्राम देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हनमंतराव कदम,उपसरपंच बाबूराव कदम, माजी सरपंच मा.नवनाथ शिंदे, ह. भ. प. बबन महाराज, धर्मेंद्र चव्हाण, भिकु बूवा, पै. राजाराम कदम, पांडुरंग पवार, संजय यादव, नामदेव कदम, शिवाजी कदम, सर्जेराव लकडे, दिपक पवार, अशोक पटकरी, आत्माराम कदम, आण्णा वेताळ, शिवाजी कदम, भास्कर कदम, संदीप महाडिक, दिलीप कदम, बालाजी कुंभार, दादा राऊत,संतोष कदम, राहुल ताटे यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## टाटा मोटर्सकडून एस प्रो लाँच ; कार्गो मोबिलिटीमध्ये नवीन युगाचा शुभारंभ

**पुणे : हॅलो प्रभात**

टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लाँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.



उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# ‘साई फ्रुट’ क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी इस्माईल सय्यद



**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी शहरातील साई फ्रुट अर्बन को.ऑफ.क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी इस्माईल गुलाब सय्यद

तर व्हा. चेअरमनपदी भागचंद पुंजा नारद यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. साई फ्रुट अर्बन को.ऑफ.क्रेडिट सोसायटीच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब रासकर यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ निवड प्रकिया पार पडली.

यावेळी रमेश गोडसे, अनिल डोळस, मुनिर शेख, अब्बास सय्यद, राजू साळवे, वसीम सय्यद, रेहाना सय्यद, द्वारका नारद,

संतोष मोरे यांची संचालकपदी तर स्वीकृत संचालक म्हणून सरदार सय्यद यांची निवड करण्यात आली.

# . संमिश्र .

## शहरात २५ एकरांवर देवराई वन उभारणार सयाजी शिंदे यांचा संकल्प



**कागल : हॅलो प्रभात**

कागल नगरपालिका हद्दीत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या सहयोगातून २५ एकरांवर ’देवराई वन’ उभारणार असल्याचा संकल्प सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी व्यक्त केला. सयाजी शिंदे यांनी आज कागल शहराला भेट देऊन कागलमधील विकासकामे, हरितपट्टे, नक्षत्र बागा आदींची पाहणी केली. मंत्री श्री. मुश्रीफ यांच्याशी या उपक्रमाबद्दल याआधीच आपली चर्चा झाल्याचेही ते म्हणाले.

सुरुवातीला अभिनेते सयाजी शिंदे यांनी श्रीमंत जयसिंगराव घाटगे तलाव परिसरात नव्याने निर्माण होत असलेल्या ’द हर्ट गार्डन’ ला भेट दिली व वृक्षारोपण केले. ही बाग अगदी लहान मुलांपासून तरुण मध्यमवयीन व अगदी वयोवृद्धांच्या साठी ही उपयोगी पडेल. या बागेत करावयाच्या तीन हजार रोपांच्या वृक्षारोपणाचे नियोजन व वृक्षांची विविधता याबद्दल श्री. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री.शिंदे यांनी देवराई वन तयार करण्यासाठी कागल नगरपालिका हद्दीतील श्रीमंत जयसिंगराव घाटगे तलाव पाणलोट क्षेत्रातील २५ एकर जमिनीची मागणी केली. तसेच; त्यांनी या जागेची पाहणीही केली. या देवराई वनात पश्चिम घाटमाथ्यावरील विलुप्त होत चाललेल्या एक हजारांवर विविध वृक्ष प्रजातींची लागवड आणि दहा वर्षे संगोपन केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या देवराई वनातील पंधरा हजाराहून अधिक विविध वनस्पती येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्राणज्योती ठरतील, असेही ते म्हणाले. यावेळी वनस्पती तज्ज्ञ सुहास वायंगणकर, के.डी.सी.सी.बँकेचे संचालक प्रताप माने, प्रवीण काळबर, आर्किटेक्चर स्वप्निल संकपाळ, सौरभ पाटील, सतीश घाडगे आदी उपस्थित होते.

## पुण्यात ७ व्या हेलिकॉप्टर आणि स्मॉल एअरक्राफ्ट परिषदेचे आयोजन



**पुणे : हॅलो प्रभात**

नागरी उड्डाण मंत्रालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकार, पवन हंस आणि फिक्की यांच्या सहकार्याने ७ वी हेलिकॉप्टर आणि स्मॉल एअरक्राफ्ट परिषदचे पुण्यात आयोजित करण्यात आले. या परिषदेला नागरी उड्डाण खात्याचे केंद्रीय मंत्री राममोहन नायडू किंजरापू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर नागरी उड्डाण राज्यमंत्री श्री मुरलीधर मोहोळ सन्माननीय अतिथी म्हणून सहभागी झाले होते. या परिषदेत २० राज्य सरकारांचे प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, गिफ्ट सिटी,राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच नागरी उड्डाण मंत्रालय, पवन हंस लिमिटेड येथील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले.

## टाटा मोटर्सने केली हॅरियर इव्हीच्या किंमतींची घोषणा



**मुंबई : हॅलो प्रभात**

टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या चार-चाकी इव्ही उत्पादकाने आज भारतात बनलेल्या सर्वात दमदार एसयूव्ही हॅरियर. इव्हीच्या प्रारंभिक किंमतींची घोषणा केली. २ जुलै पासून हॅरियर. इव्हीचे बुकिंग सुरू होत आहे. रियर-व्हील ड्राइव्ह द्वारा संचालित प्रकारासाठीच्या प्रारंभिक किंमती २१.४९ लाखांपासून सुरु होत आहेत. हॅरियर.इव्ही ॲडव्हेंचर ६५ची किंमत २१.४९ लाख रुपये, ॲडव्हेंचर एस ६५ ची किंमत २१.९९ लाख रुपये, फियरलेस+ ६५ ची किंमत २३.९९ लाख रुपये, फियरलेस+ ७५ ची किंमत २४.९९ लाख रुपये आणि एम्पॉवर्ड ७५ ची किंमत २७.४९ लाख आहे.

## नूतन गटविकास अधिकारी कदम यांचे स्वागत



**पलूस : हॅलो प्रभात**

पलूस पंचायत समिती नूतन गटविकास अधिकारी राजेश कदम नुकतेच हजर झाले. त्यांचे स्वागत व सत्कार सांगली जिल्हा ओबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, राज्य आदर्श शिक्षक सुनिल गुरव यांनी देऊन सत्कार केला. याप्रसंगी विस्तार अधिकारी डी.सी. खाडे , अभियंता बाळासो पवार मान्यवर उपस्थितीत होते.

# प्रॉपर्टी कार्ड मधील क्र.१ शेरा काढण्यासाठी मार्ग काढू

## मंत्री माधुरी मिसाळ

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

शहरातील बहुतांश प्रभागामध्ये नगररचना योजना १ व २ या दोन नगररचना १९७३ साली अस्तित्वात आल्या आहेत तेव्हा पासून नागरिकांच्या प्रॉपर्टी कार्ड मधेय क १ शेरा आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या स्वता:च्या जागेवर कोणतेच डेव्हलपमेंट करता येत नाही. बँकेचे कर्ज मिळत नाही अथवा नवीन बांधकाम करता येत नाही. त्यामुळे सदर क १ शेरा काढणे साठी भारतीय जनता पक्षाचे इचलकरंजी शहर उपाध्यक्ष दिपक पाटील यांनी राज्याच्या नगरविकास राज्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याच्या सह पालकमंत्री सौ. माधुरी मिसाळ यांची भेट घेऊन त्याना निवेदन सादर केले असून लवकरच याबाबत संबंधित शासकीय



अधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन क १ शेरा काढण्यासाठी योग्य निर्णय घेऊ असे आश्वासन मंत्री मिसाळ यांनी दिले आहे.

इचलकरंजी शहरातील बहुतांश प्रभागामध्ये नगररचना योजना १ व २ या दोन नगररचना अस्तित्वात आल्या आहेत. नागरिकांच्या प्रॉपर्टी कार्ड मध्ये क १ शेरा आहे. त्यामुळे नागरिकांच्या स्वताच्या जागा असून देखील कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ या मिळकत धारकांना मिळत नाही त्यामुळे विक्रनगर भागातील नागरिक हे इतरत्र स्थलांतरित होत आहेत.

नगर रचना योजना शासनाकडून मंजूर होऊन ५० वर्षाहून अधिक कालावधी झालेला आहे. मालमत्ता धारकांच्या अस्तित्वात विकास बाबत वस्तुनिष्ठ मोजणी व मालकी निश्चित करण्यासाठी त्यावेळच्या इचलकरंजी नगरपरिषदेने भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करणेस मान्यता दिली होती परंतु जिल्हा भूमापन अधीक्षक यांनी मनुष्यबळ अभावी या कार्यालयाकडून मोजणी करता येणार नाही असा अहवाल सादर केला त्यामुळे तत्कालीन आमदार सुरेश हाळवणकर यांनी दिनांक २३ मार्च २०१६ रोजी नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे बैठक लावून खाजगी एजन्सी मार्फत मोजणी करण्याबाबत मंजुरी घेतली यानुसार सारथी एजन्सी पुणे

यांनी जागेवर वस्तुनिष्ठ मोजणी करून ४५ अभिलेख दिनांक २३ ऑगस्ट २०१९ रोजी नगर भूमापन कार्यालय कडे अधिप्रमाणित करणे कामी सादर केले आहेत. परंतु खाजगी एजन्सीने तयार केलेले नकाशे अधिप्रमाणित करता येणार नाही असे मत भूमापन विभागामार्फत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे सदरचे काम सन २०१९ पासून प्रलंबित आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांच्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. याबाबत योग्य मार्ग काढण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, जिल्हा भूमापन अधिकारी, इचलकरंजी भूमापन अधिकारी,

इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त व संबंधित महापालिका अधिकारी यांच्या समवेत व्यापक बैठक घेऊन तात्काळ तोडगा काढावा या मागणी साठी भारतीय जनता पक्षाचे इचलकरंजी शहर उपाध्यक्ष दिपक पाटील यांनी राज्याच्या नगरविकास राज्य मंत्री तथा सह पालकमंत्री सौ. माधुरी मिसाळ यांना प्रत्यक्ष भेटून मागणी केली. यावेळी लवकरच याबाबत संबंधित शासकीय अधिकारी समवेत बैठक घेऊन योग्य मार्ग काढू असे आश्वासन मंत्री मिसाळ यांनी दिले आहे.

## चांदोलीत २१ दिवसात ५.६८ टीएमसी पाण्याची वाढ

**शिराळा : नारायण घोडे पाटील**

चांदोली धरण पाणलोट क्षेत्रात गेल्या आठ दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे. सलग चार दिवसापासून अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे धरणाच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाली आहे. गेल्या २१ दिवसात तर ५.६८ टीएमसी पाण्याची वाढ धरणात झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत ८.७३ टीएमसी अधिक पाणीसाठा यंदा आहे. सध्या धरणात १९.३६ टीएमसी पाणीसाठा असून धरण ५६.२९% भरले आहे.

चांदोली धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण चार ते पाच हजार मिलिमीटर इतके आहे. यंदा पावसाने मे महिन्यातच सुरुवात केली आहे. मे महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे धरणात अर्धा ते पाऊण टीएमसी पाण्याची वाढ झाली.

गेल्या २४ तासात ३३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पाणलोट क्षेत्रात सुरु असलेल्या संततधार पावसामुळे



धरणात जवळपास ७९५१ क्युसेक्स पाण्याची आवक होत आहे. तर वीज निर्मिती केंद्रातून १७२० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग नदीपात्रात होत आहे.

पावसाचा जोर आणि वीज निर्मिती केंद्रातून सुरू असणारा विसर्ग यामुळे वारणा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. ओढे,नदी, नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. डोंगररांगा हिरवाईने नटल्या आहेत वातावरण अल्हाददायक बनले आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. संततधार पावसामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत .

दरम्यान आज धरणाची पाणी पातळी ६०९.५० मीटर इतकी आहे. धरणात १९.३६ टीएमसी पाणीसाठा असून त्याची टक्केवारी ५६.२९ आहे. यातील उपयुक्त पाणीसाठा १३.६८ टीएमसी असून त्याची टक्केवारी ३९.७७ आहे.

**चांदोलीतील आजची २०२५ स्थिती**

पाणीपातळी (मीटर) : ६०९.५०
२४ तासातील पाऊस (मि. मि) : ३३
एकूण पाऊस : ६०२
आवक : ७९५१ क्यूसेक्स
विसर्ग : १७२९ क्यूसेक्स
टी एम सी : १९.३६
टक्केवारी : ५६.२८

## सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेला ’अ’ऑडीट वर्ग : मानसिंगराव नाईक

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ’अ’ ऑडीट वर्ग मिळाला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १२ ते १३ टक्के जास्त प्रगती झाली आहे, असे वैधानिक लेखापरीक्षक मालाणी असोसिएट



यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. जिल्हा बँकेच्या मागील तीन वर्षाच्या प्रगतीवर त्यांनी शिक्कामोर्तब केल्याचे बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी सांगितले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची संचालक मंडळाची सभा सोमवारी अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत बँकेचे वैधानिक लेखापरीक्षक मालाणी असोसिएट पुणे यांनी बँकेचा २०२४-२५ या वर्षीचा ऑडिट रिपोर्ट सादर केला. मानसिंगराव नाईक म्हणाले, बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी केलेल्या ऑडिटमध्ये बँकेच्या कामकाजावर अतिशय समाधान व्यक्त करण्यात आले आहे. बँकेला पुन्हा एकदा ’अ’ ऑडिट वर्ग देण्यात आला आहे. गेल्या काही वर्षापासून बँकेने सतत ’अ’ ऑडिट वर्ग मिळवला. जिल्हा बँकेने २०२३-२४

या वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ या आर्थिक वर्षात १२ ते १३ टक्केनी जादा आर्थिक प्रगती केली आहे. ही बाब वैधानिक लेखापरीक्षकांनी अधोरेखित केली आहे.

बँकेचे सर्व संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे यात योगदान असल्याचेही नाईक सांगितले.

## ‘स्ट्रेटबॅट’तर्फे ‘एआय’वर आधारित स्मार्ट स्टीकर सादर



**मुंबई : हॅलो प्रभात**

देशातील आघाडीचा स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी ब्रँड असणाऱ्या ‘स्ट्रेटबॅट’ने अद्वितीय आणि क्रांतिकारी ‘एआय’वर आधारित स्मार्ट स्टीकर सादर केले असून, ते कोणत्याही क्रिकेट बॅटचे रूपांतर परफॉर्मन्स ॲनालिटिक्स साधनात करण्यास सक्षम आहे. अत्याधुनिक सेन्सर टेक्नॉलॉजीने युक्त असलेले हे स्टीकर ‘एलिव्हेट’ (शश्रशीं८) तंत्रज्ञानावर आधारित असून, फलंदाजीतील डेटा मिळवून, त्याचे विश्लेषण करून वापराच्या पद्धतीत मोठा बदल घडवून आणतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तेही बॅटच्या मूळ वजनात किंवा अनुभवात कोणताही फरक न करता. हे केवळ एक स्टीकर नसून क्रिकेटसाठी नवीन युगातील ‘एआय’वर आधारित तंत्रज्ञान आहे.

## श्रीपतराव चौगुले लॉ कॉलेजला बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता

### डॉ.के.एस.चौगुले यांची माहिती

**कोतोली : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात विधी शिक्षणाचा नवा अध्याय सुरू झाला असून, ज्ञानगंगा शिक्षण संस्थेच्या वतीने ‘श्रीपतराव चौगुले लॉ कॉलेज’ या नवीन विधी महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्याकडून अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. तब्बल तीन वर्षांच्या प्रयत्नांनंतर ही मान्यता मिळाल्याचे संस्थेचे प्रमुख डॉ. के. एस. चौगुले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. शिवाजी विद्यापीठाने नवीन विधी महाविद्यालयासाठी प्रस्ताव मागवले होते. त्यानुसार



२५ सप्टेंबर २०२३ रोजी ज्ञानगंगा संस्थेने आपला प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केला होता. त्यानंतर विद्यापीठाने शिफारस करून तो महाराष्ट्र शासनाकडे पाठवला. शासनाने १५ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयास मान्यता दिली.

यानंतर ३० डिसेंबर २०२४ रोजी विद्यापीठाकडे अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता, ज्यास दुसऱ्याच दिवशी, म्हणजे ३१ डिसेंबर २०२४ रोजी मान्यता मिळाली. बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्याकडून २३ मे २०२५ रोजी ऑनलाईन तपासणी झाली आणि १७ जून २०२५ रोजी अंतिम मान्यता पत्र प्राप्त झाले.

हा अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील पदवीधरांसाठी खुला असून, महाराष्ट्र सीईटी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून, प्रवेश क्षमतेची मर्यादा ६० विद्यार्थी इतकी आहे.

या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे कोतोली व परिसरातील विद्यार्थ्यांना कायदाशास्त्राच्या शिक्षणासाठी स्थानिक पातळीवर दर्जेदार पर्याय उपलब्ध झाला आहे. यावेळी डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. अजय चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, बबन चौगुले आदी उपस्थित होते.

## चिंचणी (अंबक) येथे समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

’शासन आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत कडेगाव तालुक्यात वांगी आणि शाळगाव नंतर चिंचणी (अंबक) येथे तिसरे छ. शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात विक्रमी १३७३ लाभार्थ्यांनी विविध योजनांचा थेट लाभ घेतला, ही बाब तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे. चिंचणी ग्रामपंचायतीच्या लोकनेते मोहनराव कदम सभागृहात पार पडलेल्या या शिबिराचे आयोजन प्रांताधिकारी रणजित भोसले व तहसीलदार अजित शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.





११७८ लाभार्थ्यांना तत्काळ दाखले वाटप करण्यात आले, तर १९५ नवीन प्रस्ताव दाखल करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महसूल नायब तहसीलदार वैष्णवी पुजारी, महेश अनारसे, डॉ. जितेश कदम, हर्षवर्धन कदम, मंडळ अधिकारी कविता जाधव, पुरवठा निरीक्षक सुनील झालटे, पुरवठा अधिकारी त्रिवेणी गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. विविध विभागांच्या एकत्रित सहभागातून सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. महसूल विभागाच्या स्टॉलवर २४० जणांना ७/१२, १४४ जणांना खाते उतारे, ३५५ लाभार्थ्यांना जात/निवासी प्रमाणपत्र, तसेच १२१ जणांना कुणबी जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या उपक्रमात ॲड. रमेश मदने, शितल मोहिते, अनेक ग्रामस्थ, पदाधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## महिलांनी समाज परिवर्तनात सक्रिय भूमिका निभावावी : प्रा.डॉ.सुनिल धनगर

**बारामती : संतोष पांढरे**

यशवंतराव होळकर प्रतिष्ठान तर्फे आयोजित अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती प्रसंगी प्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच भव्य दिव्य अशी मिरवणूक उरुळी कांचन शहरातून काढण्यात आली.सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव प्रतिष्ठान, समस्त समाज बांधव व समस्त ग्रामस्थ उरुळी कांचन पंचक्रोशी यांनी केले होते. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शब्द जादुगार महाराष्ट्राचे युवा वक्ते प्रा.डॉ. सुनिल धनगर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.आयोजित सांज प्रबोधन व्याख्यानमाला या कार्यक्रमात



‘महापुरुषांच्या विचारांचे आचरण व आधुनिक समाजातील स्त्रीशक्तीचे योगदान‘ या विषयावर चिंतन कार्यक्रमात प्रमुख वक्त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तृत्व, समाजसेवा, न्यायप्रियता आणि प्रजासत्ताक धोरणे यांचा मागोवा घेतला.त्यांनी महापुरुषांचे विचार केवळ स्मरणात ठेवण्याऐवजी आचरणात आणले पाहिजेत, यावर विशेष भर दिला.स्त्रीशक्ती या विषयावर बोलताना वक्त्यांनी आजच्या काळात महिलांनी विविध क्षेत्रात केलेली प्रगती, नेतृत्व व सामाजिक योगदान अधोरेखित केले.अहिल्यादेवींप्रमाणेच आजही महिलांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने पुढे जात समाज परिवर्तनात सक्रिय भूमिका निभावावी असे आवाहन प्रा.डॉक्टर सुनिल धनगर यांनी केले.अहिल्यादेवींनीही शिक्षण प्रसारासाठी योगदान दिले होते.समाज विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना वक्त्यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्तीने शिक्षणाची कास धरून स्वत:चा सर्वांगीण विकास साधावा.शिक्षण हे समाज सुधारण्याचे सर्वोत्तम साधन आहे.कार्यक्रमात स्वत:चा विकास करून समाजऋण फेडण्याची जबाबदारी प्रत्येक सुजाण नागरिकावर आहे, हे ठसवले गेले. कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव, आणि आत्मविकास या त्रिसूत्रीचा आदर्श समाजात रुजवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यशवंतराव होळकर प्रतिष्ठान तर्फे आयोजक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंती भव्य दिव्य होण्यासाठी अप्पासाहेब वाघमोडे, बळीरामजी दुबे, प्रा.अजय गाढवे, सिद्धेश्वर यमगर, बापूसाहेब करे, बाळासाहेब मदने, मारुती कोकाटे, राहुल आगलावे, सागर आगलावे, दिलीप गाडेकर, नवनाथ मासाळ, बाबासाहेब गायकवाड, बाबुराव मदने, शिंगुदेव खताळ तसेच मित्र मंडळी यांचे लाख मोलाचे सहकार्य लाभले. या प्रसंगी प्रा.डॉ.सुनिल धनगर, संतोष ह. कांचन, सुभाष टिळेकर, विकास जगताप, सुनील कांचन, संतोष आ.कांचन,सुभाष बगाडे,संतोष गायकवाड,

उरुळी कांचन तथा पंचकृषीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मान्यवर, महिला प्रतिनिधी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग साहित्य वाटपात अहिल्यानगर देशात प्रथम : डॉ.सुजय विखे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

देशातील दिव्यांगांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजना आणली या योजनेच्या माध्यमातून देशातील दिव्यांग, वयोवृद्धांना सहाय्यक साधने वाटपासाठी बजेटमध्ये एका वर्षाकरिता ७० कोटींची तरतूद करण्यात आली. त्यापैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात एकाच वर्षात ४५ कोटी रुपयांची सहाय्यक साधने आणणारा देशातील एकमेव खासदार ठरलो आणि त्याच माध्यमातून सर्वाधिक चाळीस हजार लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणारा अहिल्यानगर जिल्हा हा देशात प्रथमस्थानी राहिला आहे. असे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष माजी खासदार डॉ.



सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे.

कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथे लोकनेते स्वर्गीय नामदेवरावजी परजणे पाटील यांच्या २१व्या पुण्यस्मरणानिमित्त संवत्सर परिसरातील २१० दिव्यांग, वयोवृद्धांना प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र, अहिल्यानगर यांच्यामार्फत सहाय्यक साधनांचे रविवारी (दि.२२) वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. विखे पाटील अध्यक्षस्थानाहुन बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील व नामदेवरावजी परजणे पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. आभार प्रदर्शनाप्रसंगी राजेश परजणे म्हणाले, सुजय विखे यांच्या माध्यमातून विखे परिवाराची चौथी पिढी ही जनसेवेसाठी यशस्वीरित्या काम करत आहे. यातूनच जनतेचे विखे परिवारावर किती प्रेम आहे हे लक्षात येते. खासदारकीच्या पराभवानंतर अवघ्या काही दिवसातच पुनश्च एकदा कामाला लागून सुजयवर जनतेचे असलेले प्रेम जनतेने दाखवून दिले आहे. दरम्यान या कॅम्पसाठी डॉ. अभिजित दिवटे यांचे सहकार्य लाभले.

# जिओमध्ये गुंतवणूक आयुष्यातली सर्वात मोठी रीस्क : मुकेश अंबानी




**मुंबई : हॅलो प्रभात**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांनी खुलासा केला आहे की, टेलिकॉम क्षेत्रातील ‘जिओ’मध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे हे त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे धाडस होते. त्या काळात अनेक विश्लेषकांना या योजनेच्या यशाबाबत शंका होती. त्यांचे म्हणणे होते की भारत इतक्या प्रगत डिजिटल तंत्रज्ञानासाठी तयार नाही. जिओमध्ये केलेली गुंतवणूक अपेक्षित परतावा देऊ शकली नसती, तरीसुद्धा ती भारताच्या डिजिटायझेशनच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरली असती, असे अंबानी यांनी मॅकिन्झी अँड कंपनीला दिलेल्या एका मुलाखतीत सांगितले. रिलायन्स जिओमध्ये गुंतवणुकीचा निर्णय घेणे फार सोपे नव्हते. त्या काळात आम्ही आमच्याच पैशाने गुंतवणूक करत होतो आणि मी स्वतः प्रमुख शेअर होल्डर होतो. आम्ही मोठे धोके पत्करले कारण आमच्यासाठी ‘स्केल’ महत्वाचा होता आणि आमची ध्येयंही खूप मोठी होती.

# श्री दत्त देवस्थान अन्नछत्राचा केंद्र सरकारकडून गौरव

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील श्री नृसिंह सरस्वती स्वामी दत्त देव संस्थान मार्फत चालवल्या जाणाऱ्या वेदमूर्ती भैरमभट्ट जेरे प्रसादालयास भारत सरकारच्या स्वास्थ्य व परिवार कल्याण मंत्रालयाकडून सर्वोच्च मानले जाणारे 'एफ एस एस ए आय' प्रमाणपत्र देऊन गौरविले आहे . येथील श्री नृसिंह सरस्वती स्वामी दत्त देव संस्थान भक्त भाविकांच्या सोयीसाठी तसेच विविध सामाजिक उपक्रमात मदतीसाठी नेहमीच अग्रेसर असते. या देव संस्थान मार्फत गेल्या १२ वर्षापासून वेदमूर्ती भैरमभट्ट जेरे प्रसादालय भोजन प्रसाद वाटप करत आहे. येथे दत्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दुपारी व रात्री असा दोन्ही वेळला श्रींच्या महाप्रसादाचा लाभ घेता येतो. या प्रसादालयाची गुणवत्ता स्वच्छता विनम्रता याची दखल घेऊन भारत सरकारच्या परिवार व कल्याण मंत्रालयामार्फत देण्यात येणाऱ्या सर्वोच्च प्रमाणपत्र देऊन एक प्रकारचे येथे चालणाऱ्या अतुलनीय कार्याची पोहच पावती दिली आहे.

या एफ एस एस ए आय प्रमाणपत्राच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाच्या विभागाच्या वतीने भेट देण्यात आली होती. या पथकाकडून भारतीय खाद्य सुरक्षा मानक प्राधिकरणाने बनवलेल्या निकषानुसार भोजनप्रसादासह स्वच्छता,सुरक्षितता आणि सात्विकता या अंगाने पाहणी करण्यात आली. या पाहणीत दत्त देवस्थानमार्फत तयार करण्यात आलेली व्यवस्था सरस ठरली शिवाय व्यवस्थेबाबत पथकाने समाधान ही व्यक्त केले. वेदमूर्ती भैरमभट्ट प्रसादालय अन्नछत्र अखंडित सुरू ठेवण्यासाठी परिश्रम घेतलेल्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

पाहणी अहवाल भारत सरकारच्या स्वास्थ्य व कल्याण परिवार मंत्रालयाकडे पाठवला. मंत्रालयाने अहवालाची दखल घेत दत्त देव संस्थान ला अन्नछत्र साठी प्रमाणपत्र जाहीर केले नुकतेच हे प्रमाणपत्र दत्त देव संस्थानला प्राप्त झाले आहे. अशी माहिती दत्त देव संस्थानचे अध्यक्ष वैभव काळू पुजारी, सचिव गजानन गेंडे पुजारी यांनी दिली. यावेळी विश्वस्त संतोष खोंबारे पुजारी, संजय उर्फ सोनू पुजारी, पांडुरंग रुक्के पुजारी, संजय ना. पुजारी, विपुल हावळे, सदाशिव जेरे पुजारी, ओंकार पुजारी उपस्थित होते

# बेताल वक्तव्य करणाऱ्या आ.पडळकरांवर गुन्हा दाखल करा ; ख्रिस्ती समाजाची मागणी

**राहुरी : हॅलो प्रभात**

ख्रिस्ती समाजा विषयी अपमानास्पद शब्द वापरून ख्रिस्ती धर्मगुरूंना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या आ. गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल करून आमदारकी रद्द करावी, अशी मागणी ख्रिस्ती बांधवांच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

मिरज तालुक्यातील कुपवाड येथील ऋतुजा राजगे हिने दि. ६ जून रोजी आत्महत्या केली. त्यांच्या मृत्यु प्रकरणी सीआयडी चौकशी करून त्यांच्या आत्महत्तेचे रहस्य उघड व्हावे व ऋतुजाला न्याय मिळावा. तिच्या आत्महत्ते नंतर सांगली



येथील सभेत आ. पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मा विषयी काही अपमानास्पद वक्तव्य केले. ख्रिस्ती धर्मगुरू हे धर्म परिवर्तन करतात. गावात जो धर्मगुरु येईल त्याला ठोकून काढा, ख्रिस्त धर्म गुरूंना जीवे मारल्यास बक्षीस जाहीर केले. एका संविधानिक पदी असणाऱ्या व्यक्तीने धर्म गुरूंच्या जीविताला धोका निर्माण होईल असे वक्तव्य केले आहे. पोलीस निरीक्षकांनी राहुरी परिसरातील सर्व ख्रिस्ती बांधव व ख्रिस्ती धर्मगुरुंना संरक्षण द्यावे. या पुढे कोणत्याही धर्मगुरू, पास्टर, ख्रिस्ती बांधव यांना शारीरिक, जीवित आणि मानसिक हानी झाल्यास त्यास आ. पडळकर व समवैचारिक व्यक्ती कारणीभूत असतील.

ख्रिस्ती समाज हा शांतता प्रिय समाज आहे. ख्रिस्ती समाजात कोणत्याही प्रकारचे धर्म परीवर्तन करून घेतले जात नाही किंवा प्रवृत्त केले जात नाही. दोन समाजात तेढ निर्माण करणारे आ. पडळकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर बिशप मॅन्युएल गायकवाड, रेव्हरंड पास्टर सॅम्युअल साळवे, पास्टर सतिष नन्नवरे, सरोदे, प्रविण शिंदे, बोर्डे, दोंदे, प्रदिप हिवाळे, हर्षल गुप्ता, कैलास साळवे, बबलू हिवाळे, निलेश पंडित, शशिकांत साळवे, कांता गुप्ता, सुशिला कदम, सौ.गायकवाड आदिंच्या सह्या आहेत.

# समित कदम यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**मिरज : हॅलो प्रभात**

येथील जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रदेश अध्यक्ष समित कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भाजप मिरज शहर यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य तुला आयोजित करण्यात आली. वही तसेच नववी व दहावीची पुस्तक तुला करुन या वह्या तसेच इतर शैक्षणिक साहित्य मिरज हायस्कूल व बाल विद्यालय शाळेमध्ये गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

माझ्या वजनाइतके हे शैक्षणिक साहित्य वाटप होत आहे, ही कल्पना खूप सुखावणारी आहे, असे मत समित कदम यांनी व्यक्त केले. डिजिटल तसेच इतर खर्चाला फाटा देऊन या पैशातून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. तसेच हॉटेल सरपंच वाडातर्फे सांगली व मिरज शासकीय रुग्णालयात १ हजार अन्न पाकिटे वाटप करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक गणेश माळी, पांडुरंग कोरे, भाजप शहर जिल्हा सेक्रेटरी बाबासाहेब आळतेकर व भाजप, जनसुराज्य शक्ती पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बापूजी साळुंखे इंजिनिअरिंगची गुणवत्ता परंपरा कायम

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी या नामवंत अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपली शैक्षणिक गुणवत्ता आणि यशाची परंपरा कायम राखत यंदाही महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेत उत्कृष्ट निकालाची नोंद केली आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी मिळवत इन्स्टिट्यूटचे नाव उज्वल केले. या विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात संस्थेचे




मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमात बोलताना श्री. गावडे म्हणाले, शॉर्टकट न घेता, कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून सातत्याने प्रयत्न करणाऱ्यांना यश हमखास मिळते.

विद्यार्थ्यांनी समाजासाठी योगदान द्यावे आणि आधुनिक माध्यमांच्या मदतीने व्यक्तिमत्व घडवावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विरेन भिर्डी यांनी केले. त्यांनी विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, मेंटोरशिप प्रोग्रॅम, अॅकॅडमिक नियोजन, फीडबॅक सिस्टीम याबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थित विद्यार्थी व पालकांनी आपल्या भावना व्यक्त करत संस्थेच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात रजिस्ट्रार अमित आव्हाड, विभागप्रमुख, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. सुदर्शन महाडिक यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी केले.

# राजू पुजारी यांची राजर्षी शाहू पुरस्कारासाठी निवड

**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मानववादी सांस्कृतिक चळवळ दीक्षा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने दरवर्षी देण्यात देण्यात येणारा राजर्षी शाहू राष्ट्रीय पुरस्कारासाठी इचलकरंजी येथील सामाजिक युवा नेतृत्व धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष



राजू आप्पासो पुजारी यांना जाहीर झाला आहे.

पुरस्काराचे वितरण २९ जून रोजी राजश्री शाहू स्मारक भवन मिनी सभागृह कोल्हापूर येथे होणार आहे.

# कडेगाव येथे उद्या मोफत नेत्र तपासणी शिबीर

**देवराष्ट्रे : हॅलो प्रभात**

सुदर्शन आय हॉस्पिटल कडेगाव यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणीचे शिबीर शुक्रवार दि. २७ जून रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ३ पर्यंत घेण्यात येणार आहे.

या शिबिरामध्ये डोळ्यांची मोफत तपासणी, पेशंटची विशेष नेत्र पटल (रेटिना) तपासणी व महात्मा फुले योजने अंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहेत. या शिबिरामध्ये ज्यांना ऑपरेशनची आवश्यकता भासेल, त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्याची व आणण्याची सुविधा उपलब्ध करून, तपासणीनंतर डोळ्यांचा नंबर काढून अल्प दरामधे चस्मा देण्यात येणार आहे. किरण मेडिकल शॉपी तर्फे मोफत मधुमेह व रक्तदाब तपासणी केली जाणार आहे .

# वृक्षारोपणाने तासगाव शहर सुसज्ज बनवणार : सुधाकर लेंढवे

## नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**तासगाव : हॅलो प्रभात**

तासगाव नगरपालिकेकडून २१ हजार वृक्षारोपण अभियान राबवत आहोत. यामध्ये शहरातील नागरिकांनीही सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी नगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी जीव झोकून कार्यरत आहेत.



अशी माहिती तासगावचे मुख्याधिकारी सुधाकर लेंढवे यांनी वृक्षारोपण प्रसंगी दिली.नंदनवन कॉलनी येथे वृक्षारोपणावेळी नगरपालिकेतील अधिकारी, कैलास खटावकर, आयुब मणेर, राजू माळी, दर्शना वाघमोडे, तेजस भिसे तर कर्मचारी संतोष माळी,गणेश कांबळे, सचिन राडे,तसेच स्थानिक नागरिक अरुण पाटील, स्मिता पाटील, पत्रकार राजू थोरात, नारायण परदेशी, प्रवीण पांढरे, श्रवण थोरात, शिवराज पाटील यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

# सस्तेवाडी येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**फलटण : हॅलो प्रभात**

येथील सस्तेवाडी येथे अशोकराव सस्ते यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी व डोळे तपासणी शिबिर पार पडले. या शिबिरामध्ये २८० लोकांची तपासणी केली. मा.खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर, व फलटण चे विद्यमान आ. सचिन पाटील, यांच्या नेतृत्वाखाली डॉ. भगत व डॉ. माने यांच्या मार्फत आधुनिक पद्धतीने मोफत तपासणी करण्यात आली. बापूराव शिरतोडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा तालुकाध्यक्ष अमित रणवरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संतोष सावंत ,सुरेश माने ,सुनील वाबळे ,आत्माराम सस्ते ,रत्नकांत सस्ते, शितल शिंदे, सविता करे,छाया भोसले,अमर सस्ते पाटील,मुख्याध्यापिका वाबळे यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी दगडांनी काढला तारांचा ताण

**वांगी : हॅलो प्रभात**

कडेगाव तालुक्यातील वांगीतील फडीमळा येथे धोकादायक स्थितीत असलेल्या तारांचा ताण काढण्यासाठी महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांनी नामी शक्कल लढवत चक्क दगडांचा वापर करून ताण काढायचा प्रयत्न केला आहे. यामुळे महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. तारांचा चक्क दगडाने ताण काढल्यामुळे एका तारेचा प्रवाह दुसऱ्या तारेत जाऊन शॉर्टसर्किट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

# कै.आजिनाथ केचे शाळेचे स्पर्धा परीक्षांमध्ये यश



**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

आजिनाथ केचे प्राथमिक शाळा आलेगाव( खुर्द) (ता.माढा) शाळेमधून चि.ध्रुव माने (२९६)या विद्यार्थ्याने सलग दुसऱ्यांदा एटीएसई परीक्षेमध्ये राज्यात दुसरा तर मंथन परीक्षेमध्ये राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. इयत्ता दुसरी मधून सुदिक्षा वाघमारे (९४) आणि ज्ञानदीप माने (९४)यांनी राज्यात चौथा क्रमांक मिळवला आहे. इयत्ता चौथी मधून अपेक्षा सोलंकर(२९०) हिने राज्यात पाचवा क्रमांक पटकावत शाळेचे नाव राज्याच्या कानाकोपऱ्यात पोचवले आहे. विविध स्पर्धा परीक्षा मधून केंद्रामधून तन्मय लांडगे, पवन जाधव, मयुरी जाधव, युवराज केचे, स्वराज माने, विराज कोकाटे, श्रेयस जाधव, आदर्श शजी सलगर या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक पटकावत कोंढार भागामध्ये आपल्या शाळेचा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पंचक्रोशी परिसरातून कौतुक होत असून यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मान सोहळा नुकताच पार पडला.

# एम.आय.डी.सी मुळे सोनेवाडी परिसराचा विकास होणार : माजी आ.स्नेहलता कोल्हे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

सोनेवाडी परिसरातील २३६ एकर जमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहित करण्यात आली आहे. त्यापैकी १८१ एकर जमिनीवर कंपनीची उभारणी सुरू आहे. हे सर्व करत असताना नकाशातील रस्ता नामशेष झाला होता. शेतकऱ्यांची मोठी दळणवळणाची समस्या निर्माण झाली होती. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी डॉ. गणेश



राठोड यांच्या लक्षात आणून दिली. त्यांनी तात्काळ या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांना रस्ता उपलब्ध करून दिला.सोनेवाडी परिसरातील अनेक समस्या आहेत त्या सर्व समस्या सोडवण्यासाठी कोल्हे परिवार ग्रामस्थांसोबत आहे. एम.आय.डी.सी मुळे सोनेवाडी परिसराचा विकास होणार आहे. त्या दृष्टीने शासन स्तरावर केलेले प्रयत्न सफल होत असल्याचा आनंद आहे, असे प्रतिपादन कोपरगाव विधानसभेच्या माजी आ. स्नेहलताकोल्हे यांनी केले.

यावेळी आप्पासाहेब जावळे, आनंदराव जावळे, निरंजन गुडघे, भिकाजी बोंडखळ, गणपत राऊत, बबलु जावळे,जनार्दन वायसे, राजेंद्र गोतिस अदी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या अडचणी व ग्राम पंचायतीच्या विविध प्रकारच्या मागण्या ग्रामस्थांनी कोल्हे यांच्या पुढे मांडल्या. नकाशात असलेला रस्ता मिळाला. आता ग्रामपंचायतीला व्यवसायीक कर मिळावा. सोनेवाडी परिसरातील तरुणांना प्राधान्याने नोकरीसाठी कंपनीत संधी उपलब्ध करून द्याव्यात. परिसरातील रस्ते पक्के करावे. एमआयडीसी परिसरात सोनेवाडीच्या बाजूने मेन गेट करावे. एमआयडीसी परिसराला सोनेवाडी नावाचा काही अंशी उल्लेख करावा अदी मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कोल्हे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची कुठलीच आडवणुक होणार नाही यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडावे अशी सूचना कोल्हे यांनी केली होती. सूत्रसंचालन निरंजन गुडघे यांनी केले तर आभार आप्पासाहेब जावळे यांनी मानले. कोल्हे यांच्या पाठपुराव्याने सोनेवाडी परिसरातील शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ. गणेश राठोड यांचे देखील आभार ग्रामस्थांनी मानले आहे.